**प्रेसनोट** **दिनांक १८/०५/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## गंभीर गुन्हा तात्काळ उघकिस आणुन गुन्हयातील आरोपीला अटक केले

दिनांक.१५/०५/२०१९ रोजी पंचायत समिती हवेली येथील शिक्षण विस्तार अधिकारी यांनी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे हजर होवुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,लोहगांव पुणे या शाळे मधील पदविधर शिक्षक विक्रम शंकर पोतदार,वय-४२ वर्षे,रा.विद्यानगर,पुणे हा मागिल काही महिन्यापासुन त्यांचे वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विदयार्थीनी यांचेशी शिक्षक असल्याचा गैरवापर करुन, त्या वर्गात असताना, तसेच शाळेच्या मधल्या सुट्टी दरम्यान,त्यांना जवळ बोलावुन, त्यांचे मनाला लज्जा उत्पन्न होईल असे गैरकृत्य करुन त्यांचा विनयभंग करुन,त्यांनी कोठे सांगु नये म्हणुन त्यांना धमकाविले आहे, अशी तक्रार दिल्याने पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी त्यांची तात्काळ तक्रार घेवुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल केला, तपास पथकातील पोलीस कर्मचारी प्रशांत कापुरे, संजय आढारी, विष्णु गोणे,यांना आरोपीचा शोध घेणेबाबत सुचनां दिल्याने त्यांनी आरोपी विक्रम शंकर पोतदार, याचे ठाव-ठिकाणा बाबत माहीती काढुन व त्याचा शोध घेवुन त्यास तात्काळ पकडुन आणुन पोलीस निरीक्षक,गुन्हे यांचे समोर हजर केले असता,त्यांनी त्यास दाखल गुन्हयामध्ये अटक केलेले आहे. दाखल गुन्हयाचा तपास महिला पोलीस उप निरीक्षक चित्रा चौधरी करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.